# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/१०/२०२४ (बुधवार) दुपार**

## पोलीस ठाणे जलालखेडा, खापा अंतर्गत आगामी विधानसभा निवडणूक—२०२४ संबंधाने रूटमार्च

पोलीस ठाणे जलालखेडा अंतर्गत दिनांक २९/१०/२०२४ रोजीचे १६/०० ते १९/३० वा. पर्यंत आगामी विधानसभा निवडणूक—२०२४ संबंधाने पोलीस ठाणे अंतर्गत ग्राम— रोहणा, भारसिंगी, मदना, थुगावदेव येथे रूट मार्च घेण्यात आला व तेथील नागरिकांना आगामी विधानसभा निवडणूक—२०२४ संबंधाने मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले तसेच विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे पालन करून कोणताही कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याबाबत नागरिकांशी संवाद साधण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये CRPF चे पथक व पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार हजर होते.

तसेच आज रोजी पोस्टे खापा अंतर्गत दि. ३०/१०/२०२४ रोजी १८/०५ वा. ते १९/०० वा. पर्यंत आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ कार्यक्रम संबंधाने सशस्त्र सेना दल व अधिनस्त पोलीस अंमलदार यांच्यासमवेत खापा टाऊन मध्ये रूट मार्च केला आहे.








---

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर